# रितू छाब्रिया यांना मुक्ताई पुरस्कार

पुणे/प्रतिनिधी

अध्यात्म व संतांनी निर्माण केलेली परंपरा हा खरा ठेवा आहे. संतांच्या नितीमूल्यांचे शिक्षण शाळांमधून दिले पाहिजे, असे प्रतिपादन माजी राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांनी केले.

पुण्यातील शनिवारवाडा येथे आयोजित केलेल्या राज्यस्तरीय आदिशक्ती मुक्ताई स्मृतीगौरव व ज्ञानदा स्मृतीगौरव पुरस्कार वितरण सोहळ्यात त्या बोलत होत्या. यावेळी महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष दिलीप वळसे-पाटील, आत्मोन्नती व विश्वशांती साधक संस्थेचे सोपानकाका वाल्हेकर महाराज, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ देवीसिंह शेखावत, जळगाव येथील मुक्ताई संस्थानाचे अॅड. रवींद्र पाटील, अखिल भारतीय साहित्य परिषदेचे अध्यक्ष विठ्ठल पाटील, वा.ना. उत्पात आदी उपस्थित होते.

आत्मोन्नती व विश्वशांती साधक संस्था मुंबई व श्री संत आदिशक्ती मुक्ताई विश्वकल्याण फाऊंडेशनच्या वतीने 21 वर्षापासून सामाजिक व आर्थिकदृष्ट्या उपेक्षित लोकांच्या कल्याणाकरिता निःस्वार्थीपणे योगदान करणाऱ्या संस्था व व्यक्तींना मुक्ताई पुरस्कार दिला जातो. शैक्षणिक, सामाजिक व वैद्यकीय क्षेत्रामध्ये कार्यरत असणाऱ्या मुकूल माधव फाऊंडेशनने अनेकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणला आहे. त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन त्यांच्या ह्या विविध क्षेत्रातील अतुलनीय कार्याबद्दल मुकुल माधव फाऊंडेशनच्या अध्यक्षा



माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते रितु छाब्रिया यांच्यावतीने मुक्ताई पुरस्कार स्वीकारताना मीना डिसा समवेत दिलीपराव वळसे-पाटील.

रितू छाब्रिया यांना सामाजिक व धार्मिक कार्यासाठी मुक्ताई पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते संस्थेच्या सदस्य मीना डिसा यांनी हा पुरस्कार स्विकारला. यावेळी आमदार शोभा फडणवीस, अशोक गोडसे. प्रकाश देवळे, धैर्यशील मोहिते-पाटील यांना पुरस्काराने गौरविण्यात आले.